प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेल्या ध्यानाचा आणि भावना आणि विचारांच्या सकारात्मकतेचा एक विशिष्ट मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण दिव्य प्रकाशाचा (परमेश्वर) एक कण आहोत
- ★ प्रेम हा आपला मूळ स्वभाव आहे
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 2 Issue 1 OCTOBER 2009 Rs. 15

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

सृष्टीशी निगडित कित्येक यथार्थ गोष्टी, जन्म-मृत्यू, पुनर्जन्म, कर्मविपाकाचे नियम इत्यादी अशा कित्येक गोष्टींचे ज्ञान आपल्या पूर्वजांना, वडीलधाऱ्यांना होते. या ज्ञानावर आधारित, वैश्विक जीवनाला अनुकूल अशी दैनंदिन जीवन पद्धती त्यांनी आपल्यासाठी आखली होती. आपल्या जीवनात आणि वैश्विक जीवनात एकसूरता होती. आपले विचार, भावना आणि कार्य वैश्विक तत्त्वांवर आधारित असत.

आणि आपण शांती आणि समाधानाचे जीवन जगत होतो.

अशा तऱ्हेने हजारो वर्षे उलटली. मग युग बदलले. वडील माणसांनी त्यांचे वास्तव्य हलवले आणि ते इतर सूक्ष्म जगात राहू लागले. आपल्याला मार्गदर्शन करणे मात्र त्यांनी सुरू ठेवले. नंतर जेव्हा आपण अंधकाराच्या युगात, कलियुगात प्रवेश केला तेव्हा आपण त्यांच्याशी संपर्क गमावून बसलो आणि त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनालाही मुकलो. हळूहळू पुजाऱ्यांनी आपल्याला मार्गदर्शन करायला सुरुवात केली. त्यांच्या पद्धतीने त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आणि जीवनासाठी सूचना दिल्या. त्यांच्या व्याख्या आणि सूचना त्रुटीयुक्त आणि दोषपूर्ण होत्या. मग आपल्या आणि वैश्विक जीवनात एकसूरता राहिली नाही.

आणि आपण शांती गमावून बसलो आणि आपल्या जीवनात समाधान राहिले नाही.

मागील काही शतकांमध्ये या विश्वात पुष्कळ बदल झाले आहेत, घडामोडी झाल्या आहेत. आपण संपर्क गमावून बसल्यामुळे आपल्याला या गोष्टींची जाणीव नाही. वैश्विक बदलांचा आपल्या येथील जीवनावर परिणाम होतो आहे. इथे सुखी व समाधानी जीवन जगण्यासाठी आपल्याला वैश्विक जीवनाशी परत एकसूरता साधावी लागेल. ही एकसूरता साधण्यासाठी आपण काय करावे, हे मात्र आपल्याला माहीत नाही. पुजारी लोक आपले मार्गदर्शन करू शकत नाहीत कारण ते सूक्ष्मजगातील वडील माणसांच्या संपर्कात नाहीत आणि त्यांना विश्वात होणाऱ्या परिवर्तनाबद्दलही काहीच माहीत नाही. ते अज्ञानाच्या अंधकारात वावरत आहेत.

वस्तुस्थिती आणि आपलं भविष्य काही अगदीच अंधारमय नाही. आता इथे अशी काही माणसे आहेत जी सूक्ष्मजगातील वडील माणसांशी संपर्क साधू शकतात. शांती आणि समाधानाच्या जीवनाचा मार्ग शोधण्यासाठी ते त्यांच्याकडून आवश्यक असे नवीन ज्ञान आणि नव्या शक्ती प्राप्त करू शकतात.

हा जो थोडा काळ आहे, हा अंधकाराच्या युगातून प्रकाशाच्या युगाकडे नेणारा परिवर्तनाचा काळ आहे. हा काळ गोंधळ आणि भ्रमाचा काळ सुद्धा आहे. विश्वाने मात्र आपले नेतृत्व व मार्गदर्शन करण्यासाठी कितीतरी प्रकाश कार्यकर्त्यांना पाठवले आहे. प्रकाश आणि विवेकाचे सर्व बळ आता एकत्र झाले आहे आणि ते आपल्याला या गोंधळातून आणि शोषणातून बाहेर काढेल.

आपण जागे व्हायला हवे आणि प्रकाशाची निवड करायला हवी. मग आपल्याला संपूर्ण मदत आणि मार्गदर्शन मिळेल.

त्याचप्रमाणे आपण जर ध्यान केले तर आपण सूक्ष्मजगातील वडील माणसांच्या आणि विश्वाच्या संपर्कात येतो आणि त्यांच्याकडून प्रत्यक्षच सर्व ज्ञान आणि मार्गदर्शन मिळवू शकतो.

शांती आणि समाधानासाठी ध्यान अगदी जरुरी आहे. नव्या शक्तिंमुळे ज्या नव्या प्रक्रिया जागृत होत आहेत, त्यांचा आपल्यावर परिणाम होऊ देण्यासाठी एकाच बैठकीत खूप वेळ ध्यान करायला हवे. अर्थात् फक्त ध्यान करणे पुरेसे नाही.

सखोल ध्यानात आलेल्या अनुभवातून आपल्याला जे शहाणपण मिळते, त्याचा आपण आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग करायला हवा आणि उदात्त जीवन जगायला हवे. उदात्त होणे अत्यावश्यक आहे. आपल्या विचारांमध्ये, भावनांमध्ये आणि कार्यांमध्ये उदात्तता ही यायलाच हवी. उदात्ततेतच आपली प्रगती, आपली आध्यात्मिक प्रगती सामावलेली आहे. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, बंगलोर अर्बन ५६२ १४९. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१ (सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत)
इ-मेल : info@saptarishis.com वेबसाईट : www.saptarishis.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिले कॉलम वाचावे.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/-**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



३०-८-२००९ रोजी महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ३५० पेक्षा अधिक लोकांनी भाग घेतला.

## काही ठळक घडामोडी

- १९-९-२००९ रोजी, गोलाहल्ली येथे, येल्लम्मा देवीच्या पुनर्निर्मित देवळाचे उद्घाटन करण्यात आले.
- ज्या साधकांनी तीन महीने रोज तीन तास ध्यान केले होते त्यांना ३०-८-२००९ रोजी दीक्षा देऊन 'रा-गटात' सामील करण्यात आले. त्याच दिवशी 'लाईट चॅनल गटात' कार्य करणाऱ्या साधकांना सुद्धा कार्यासाठी दीक्षा देण्यात आली.
- स्टडी सेंटर चे काम आता पुढच्या स्तरावर सुरु झाले आहे. आता पहिल्यापेक्षा अधिक लोक नवीन योजनांवर काम करीत आहेत.
- ३०-८-२००९ रोजी 'Beyond 2012' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. तसेच '2012 End or Beginning' ह्या पुस्तकाचा मराठी, कन्नड व तामीळ भाषांतील अनुवाद; 'Light' ह्या पुस्तिकेचा मराठी, हिंदी, कन्नड, तेलूगू व तामीळ भाषांतील अनुवाद आणि 'Dhyan Yoga' ह्या पुस्तकाचा हिंदी भाषेतील अनुवाद प्रकाशित करण्यात आला.
- विद्यार्थ्यांसाठी आठवड्याअंती तपोनगर येथे राहाण्याची सोय आता करण्यात आली आहे.

## रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| शांता लक्ष्मीकांत, कृष्ण कुमार आणि प्रभा | ०२-०८-२००९ |
| अभिजीत शिंगाडे, सात्विक आणि एक शुभचिंतक | ०९-०८-२००९ |
| अर्चना हरीश आणि भूदेवी | १६-०८-२००९ |
| ललिता तीर्थ, ऊषा मंजुनाथ, विजयकुमार, पुंडलिक ढाकोरकर, हर्षा, हर्षिता आणि बालसुब्रमणिअन एस. | २३-०८-२००९ |
| कार्तिकेयन, केतकी तळवलकर आणि रामकृष्ण मालवाडे | ३०-०८-२००९ |

## तपोनगरातील कार्यक्रम

दर रविवारी – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत
– विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत

दर शुक्रवारी – लाईट चॅनलिंगचे कार्य सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत

१८ ऑक्टोबर– रा-गटाची बैठक, दुपारी २ वाजता
लाईट चॅनल्स गटाची बैठक, दुपारी २.३० वाजता

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०४ | रविवार | पौर्णिमा |
| ११ | रविवार | कृष्णाष्टमी |
| १६ | शुक्रवार | शिवरात्री |
| १७ | शनिवार | नरक चतुर्दशी / महालक्ष्मी पूजन |
| १८ | रविवार | अमावास्या |
| १९ | सोमवार | दिवाळी |
| २८ | बुधवार | शुक्ल दशमी |

गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष ग्रुपच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

भजनांची CD आणि 'महर्षी अमरांचा आवाज' ही CD आता उपलब्ध आहे. ह्यासाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

**रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.**

## कृपया नोंद घ्यावी

- ह्यापुढे आपल्या सर्व ध्यान-साधकांनी रोज पांढऱ्या प्रकाशाचे प्रसारण करायला हवे. (पान ३ वर ह्यासाठी तंत्र दिलेले आहे)
- बाहेरील विद्यार्थी सुद्धा तीन महिने रोज तीन तासांसाठी ध्यान केल्यानंतर रा-गटाचे सदस्य होऊ शकतात.

## महर्षी अमरांचा महासमाधी दिन

(३०–०८–२००९ रोजी गुरुजींनी दिलेल्या व्याख्यानातील काही वेचे)
संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

आज येथे जमलेले आपण सर्वजण फार भाग्यवान आहोत.

महर्षी अमरांनी या जगाला ध्यानाचे शास्त्र दिले. त्यांनी ते ऋषींकडून प्राप्त केले होते. त्यांनी ऋषींचा व परमेश्वराचा आपल्या जीवनात समावेश केला. त्यांनी सांगितले की ऋषी व परमेश्वर खरच अस्तित्वात आहेत, कारण ते त्यांना प्रत्यक्ष भेटले होते.

त्यांनी सांगितले की, आध्यात्मिक असणे म्हणजे प्रामाणिक व चांगले असणे. यापूर्वी कोणीही याबाबत इतक्या अधिकारवाणीने व स्पष्ट बोलले नव्हते. त्यांनी आपल्याला बाह्य जगांची ओळख करुन दिली. त्यांनी 'आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण' या पुस्तकाच्या माध्यमातून, संपूर्ण सृष्टीच्या निर्मितीची कथा थोडक्यात सांगितली. १९७४ साली कलियुगाचा अंत झाला असे त्यांनी आपल्याला सांगितले. शंबला गोबी वाळवंटात आहे असे त्यांनी ठामपणे सांगितले कारण त्यांनी स्वत: शंबलाला बऱ्याचवेळा भेटी दिल्या होत्या.

त्यांनी सांगितले, "विनम्रता ही आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण आहे. ईगो किंवा अहंभाव हा आपण व परमेश्वर या मधला सर्वात मोठा अडथळा आहे. भगवा रंग परिधान करणे आवश्यक नसून, इतरांना आपल्या वागण्यातून तो दिसला पाहिजे. ध्यान म्हणजे एकाग्रता नव्हे. ध्यान साधकांच्या संख्येपेक्षा, ध्यानाचा दर्जा महत्त्वाचा आहे." तसेच होम, यज्ञ व कुंभाभिषेक इत्यादी सारख्या रूढ विधींची अप्रासंगिकता त्यांनी आपल्यासमोर उघड केली.

महर्षी अमर आपल्या जीवनातील प्रकाश आहेत. 'अमर' हे एक तत्त्व आहे. त्यांनी अनेक सुंदर गोष्टी विशद करून सांगितल्या. त्यापैकी काही गोष्टी मी नमूद करतो: "चराचर सृष्टी नेहमीच सुज्ञ असते. आता सध्याच्या काळात ती अजूनच सुज्ञ झाली आहे. ती अतिशय दृढपणे अधिकाधिक सुजाण होत जाते कारण चराचर सृष्टी नियमितपणे आत्मनिरीक्षण करत असते, आपल्या त्रुटींचा स्वीकार करते व स्वत:त दुरुस्ती करते. आत्मनिरीक्षण करणे, त्रुटींचा स्वीकार करणे व त्या दुरुस्त करणे हा साधनेचा एक भाग आहे. सृष्टी सध्या दुरुस्ती करण्याची व सुधारणा करण्याची प्रक्रिया अतिशय प्रकर्षाने करीत आहे. आवश्यक ते बदल केले जात आहेत.

अखंडपणे क्षमा करत राहणे व परीक्षेशिवाय कृपेचा वर्षाव करत राहणे, हे आता असे चालू राहणार नाही. कृपा व क्षमेसाठी आपण पात्र ठरले पाहिजे व ती योग्यता आपल्यात असायला हवी. आता ताबडतोब कारवाई करण्याची वेळ आहे.

परमेश्वराच्या प्रकट व तसेच अप्रकट भागातील, आपल्याला आतापर्यंत अज्ञात असलेल्या विविध लोकांचे ज्ञान आपल्याला ऋषींकडून मिळत आहे. तसेच बरीचशी माहिती देखील आपल्यासमोर उघड केली जात आहे. आपल्या जाणिवेत विस्तार घडावा व आपण सर्व एक आहोत ह्याची जाणीव आपल्याला व्हावी, याकरिता ही माहिती आपल्याला देण्यात येत आहे.

हा प्रकाशमय जीवन जगण्याचा काळ आहे. या करिता आपल्याला ध्यान केले पाहिजे व सकारात्मक बनले पाहिजे."

हा गोंधळाचा काळ आहे. सृष्टी म्हणते आहे "हे चांगलेच आहे. जेव्हा कधी आपण गोंधळातून जातो तेव्हा काहीतरी नवीन जन्मास येते." या काळात सर्व सदोष मानवी व्यवस्था कोलमडून पडतील व नवीन व्यवस्था उदयास येतील याची काळजी सृष्टी घेत आहे. ह्या नवीन व्यवस्था येथे आणण्यासाठी बरेच कार्य चालू आहे. याचे परिणाम आपल्याला लवकरच पाहायला मिळतील.

२५ ऑगस्ट पासून तीन दिवसांसाठी आम्ही काही जणांनी 'रा'च्या शक्ती व इतर काही महत्त्वाच्या शक्तींचे प्रवहन केले. या शक्ती 'रा' मंदिराच्या खाली ८४० फुट खोलवर असलेल्या एका सूक्ष्म कक्षात साठविण्यात आल्या आहेत. या शक्ती आपल्या प्रगतीसाठी व आपल्यात बदल घडवून आणण्यासाठी आहेत. या प्रवहनात सोलुंट्राने सूक्ष्मदेहाने भाग घेतला. तिला 'रा' कडून काही विशेष सूचना मिळाल्या, त्या अशा आहेत – "उपवास करून तुमच्या शरीरास तयार करा. तुमच्यातील सर्व नकारात्मक भावनांना व विचारांना बाहेर येऊ द्या, त्यांना दाबून ठेवू नका तर त्यांचा सामना करा आणि त्यांना संपवून टाका. स्वत:ला बरे करा. स्वत:च्या अंत:स्फूर्तिवर विश्वास ठेवा."

आपल्या अभ्यासकेंद्राने मोठे कार्य केले आहे. आता त्याचा विस्तार होतो आहे. भविष्यात हे भावी नेत्यांचे प्रशिक्षण केंद्र बनेल. भावी ऋषींना या केंद्रात प्रशिक्षण दिले जाईल.

आपल्याला हे सर्व महर्षी अमरांमुळे प्राप्त झाले आहे. त्यांना शक्ती अर्पण करून, आपण त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता व आपला आदर व्यक्त करू या. ■

## प्रकाश प्रसारणाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणातील चळवळ आहे. आपल्या या जगात सर्वांना शांती आणि प्रेमाचे जीवन जगता यावे त्यासाठी ही चळवळ आहे. व्याख्यानं, उपदेशं आणि पताका नसलेली ही अशी वेगळीच चळवळ आहे. वरील उच्च जगांतून फक्त प्रकाश पृथ्वीवर आणावा आणि सर्वत्र प्रसारित करावा, एवढेच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाही, ते सर्व हा प्रकाशच घडवून आणू शकतो.

जेव्हा आपण हा प्रकाश सर्वत्र पसरवतो, तेव्हा तो इतरांच्या घरात व त्यांच्या हृदयात प्रवेश करतो. त्यांच्या भावना आणि विचारांमधे असलेल्या अंध:काराला हा प्रकाश दूर करतो आणि अशाप्रकारे वैयक्तिक बदलाव होतात. वैयक्तिक बदलावांमुळे सर्व जगच बदलायला सुरुवात होते आणि प्रकाशमय होते.

हा प्रकाश म्हणजे आपल्या डोळ्यांना दिसत असलेला प्रकाश नसून हा अस्तित्वाच्या गाभ्यातील अतिसूक्ष्म प्रकाश आहे. अस्तित्वाच्या ह्या गाभ्यातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्वकाही आहे; ताकद आहे, शहाणपण आहे आणि सृष्टीचे भवितव्य पण आहे. तो अदृश्य आहे पण सर्वत्र पसरलेला आहे.

**आपण दर रोज ७ मिनिटांसाठी हा प्रकाश वरून पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवू शकतो. झोपून उठल्यावर सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी आपण ह्याचा अभ्यास करू शकतो आणि या जगात बदल घडवून आणू शकतो.**

या जागतिक चळवळीची सुरुवात १८–५–२००८ ला तारामंडलीय परिषदेनी, सप्तर्षींनी, गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत सुरु केली.

ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**प्राचीन ऋषींनी दिलेली ही सात तत्त्वे आहेत. आपल्या पृथ्वीवर असलेले प्रकाशाचे शहर शंबला येथे राहणारे लोक या तत्त्वांचा अभ्यास करतात. शंबलातील लोक चिरतरुण आहेत आणि ते शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगत असतात.**

१. आपल्या अंतरंगात, गाभ्यात असलेल्या प्रकाशाचा अनुभव करावा आणि सभोवताली पसरवावा.
२. प्रेमाचा अनुभव करावा आणि हे प्रेम सर्वत्र पसरवावे.
३. सर्व जीवांमधे आणि सर्व निर्जीव वस्तुंमधे जीवनाच्या एकत्वाचा अनुभव करावा.
४. दिवसाची सुरुवात करतांना, त्यादिवशी जी कामं करायची आहेत, ती आधी मनात ठरवावी, मग ती हळू आवाजात स्वत:शीच पुटपुटावीत आणि मग ती कामं प्रत्यक्ष करावीत.
५. आपले ध्येय पूर्ण होण्याआधी त्याबद्दल कमीत कमी बोलून, गुप्ततेच्या नियमाचे पालन करावे.
६. आपल्यातील नकारात्मक शक्तींशी लढा देण्यासाठी मन, बुद्धी आणि शरीर यांना एकजूट करावे.
७. उच्च आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी आपण स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवावी.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

०२–०८–२००९

आपण प्रकाशाला आपल्या शरीर यंत्रणेमध्ये अशा रीतीने भरून घेतले पाहिजे की अनेक गोष्टींपासून, अगदी रोगाच्या साथीपासून सुद्धा तो आपले संरक्षण करू शकेल. 'रा' म्हणजेच प्रकाश ब्रह्माच्या शक्ती बलवत्तर संरक्षक कवचाचे काम करतात. जर आपण शुद्ध असू तर नक्कीच आपले रक्षण होते.

स्वाइन फ्लू हा आपल्या सामूहिक कर्मांचा आनुषंगिक परिणाम आहे. तुम्ही प्रकाश प्रसारित करा, प्रकाश शोषून घ्या आणि तुमच्या सभोवती प्रकाशाची ढाल बनवा. तुम्हाला स्वाइन फ्लूची बाधा होणार नाही. याचा अर्थ असा नाही की मनुष्य पातळीवर जी काळजी घेणे आवश्यक आहे ती तुम्ही हवेत सोडून द्यावी. तुम्ही योग्य ती खबरदारी घ्यायलाच हवी आणि प्रकाशासोबत सुद्धा राहायला हवे. मग तुमच्याकडे स्वाइन फ्लू फिरकणार नाही.

२८ ऑगस्ट पासून प्रकाश ब्रह्मापासून मिळू लागलेल्या शक्तींमुळे कार्याचे एक नवीन पर्व सुरू होईल. या शक्ती धारण करीत असलेले महान ज्ञान पूर्णपणे आत्मसात करणे सोपे नाही. नवीन पर्वातील आपले कार्य सुरू करण्यासाठी मोठ्या प्रमाणात संघटनाचे काम सुरू आहे. ज्यांनी हे कार्य करण्याची तयारी दाखविली आहे अशा सर्वांना कार्यात सामावून घेण्याची आमची इच्छा आहे. आम्ही काही सुस्पष्ट सूचनांची प्रतीक्षा करीत आहोत.

श्रद्धा ही अस्तित्वाची एक अवस्था आहे. ते समर्पणाचे एक अंग आहे. श्रद्धा प्रेमापोटी जन्मते. श्रद्धा निरंतर चालू राहते. श्रद्धा तुमची तुम्हाला जोपासावी लागते. ती शिकवता येत नाही की देता येत नाही. कोणीतरी म्हटले आहे, "तुमच्याजवळ जर श्रद्धा नसेल तर तुम्हाला काहीही आशा नाही."

टोकाच्या भावना आपल्याला वस्तूंच्या व माणसांच्या मायेत जखडून आपल्या आयुष्यात काहूर माजवतात आणि आपल्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये अडथळा आणतात. आपल्याला एकतर त्यांचे उदात्तीकरण करावे लागते किंवा त्यांना मुळापासून उपटून टाकावे लागते. यासाठी आपल्याला ध्यान करावे लागते व सकारात्मक बनावे लागते. त्याचबरोबर सर्व स्तरांवर जाणीव विस्तारण्यासाठी तुम्ही प्रकाशाचा उपयोग करा आणि आम्ही दिलेले सर्व ज्ञान व सर्व तंत्रे उपयोगात आणा.

तुम्ही एकटे असा अथवा समूहात असा, जिथे कुठे असाल तिथे तुम्ही आध्यात्मिक असले पाहिजे. अर्धवेळ आध्यात्मिकता असे काही नसते. जर एखादा माणूस म्हणाला, "मी एखाद्या माणसाला मारू शकतो; हा माझा वैयक्तिक मामला आहे," तर तो माणूस आध्यात्मिक असू शकत नाही.

डिसेंबर २००९ पासून मोठ्या बदलांना सुरुवात होईल कारण तेव्हा आपण फोटॉन बेल्टच्या प्रभामंडळा मध्ये प्रवेश करू. तेव्हा खूप गोंधळ माजेल आणि पुष्कळ काम करावे लागेल ज्यासाठी आम्हाला बरेच कार्यकर्ते लागतील. विश्वामित्र महर्षी त्यासाठी एक नवीन गट बनवित आहेत.

एका व्यक्तीला याआधीच ऋषीपद देण्यात आले आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. २५ ऑगस्टला दोन स्त्रियांना ऋषीपद देण्यात येणार आहे. अनेक विस्मयकारक गोष्टी घडत आहेत. ज्ञानाचा महापूर लोटणार आहे.

०९–०८–०९

हा साक्षात्कारांचा मोसम आहे. ऋषींनी आपल्यापाशी उघड केले आहे की आपण ज्या परब्रह्म लोकात राहतो त्याच्या व्यतिरिक्त अनेक लोक आहेत. मला एका विशिष्ट लोकाविषयी माहिती काढण्या बद्दल सांगण्यात आले. त्या लोकाने स्वतःच माहिती दिली. तो म्हणाला, "या लोकात प्रत्येक वस्तू प्रेमापासून बनली आहे." तेथे इतर रंगाबरोबरच मला मुख्यत्वेकरुन गुलाबी रंग दिसत होता. प्रेमापासून बनलेला प्रकाश मी पाहू शकलो, तसेच प्रेमाने भरलेली माणसे देखील पाहू शकलो. आपल्या ह्या पृथ्वीवर प्रेमाचा किती अभाव आहे! हा प्रेमाचा अभाव नष्ट करण्यासाठी ऋषी त्या विशिष्ट लोकातून शक्ती आणणार आहेत. २५ ऑगस्टपासून ह्या उत्तम कार्याचा आरंभ होईल.

'रा' म्हणजेच प्रकाश ब्रह्माच्या शक्तींमध्ये निरतिशय प्रेम आणि हीलिंग म्हणजे बरे करण्याचे गुण असतात. अतिशय वेगाने विकास साधण्यात त्या आपली मदत करतात. पण जर आपण योग्य प्रतिसाद दिला नाही तर त्या लगेच आपल्याला सुधारतात. २०१२ नंतर आपल्याला या शक्ती स्वीकाराव्या लागतील नाहीतर या शक्ती आपल्याला नको असताना देखील आपल्या शरीरात प्रवेश करतील. आपले इच्छास्वातंत्र्य पूर्णपणे काढून घेतले जाईल किंवा त्यावर मर्यादा घातल्या जातील.

विश्वामित्र महर्षी त्यांच्या नवीन गटातील लोकांची नावे देवाजवळ नोंदविणार आहेत. जोपर्यंत सृष्टी अस्तित्वात आहे तोपर्यंत हा 'व्ही गट' अस्तित्वात राहील. ते आधीच ह्या लोकांशी सूक्ष्म जगात बोलले आहेत. ह्या लोकांना त्यागाची तयारी ठेवावी लागेल आणि त्यांच्या अहंकाराला दूर ठेवावे लागेल.

निरनिराळ्या टप्प्यांवर असलेल्या साधकांचे निरीक्षण करणे फार मजेदार असते. त्यातले काही म्हणतात की फक्त ध्यान करणे पुरेसे आहे. ते सकारात्मक बनत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये परिवर्तन घडत नाही. काही जण तंत्रांच्या मागे वेडे होतात. तर काही जण सारखे सारखे एका मार्गातून दुसऱ्या मार्गात उड्या मारत असतात. त्याशिवाय कुंडलिनी साठी वेडे होणारे ही काही जण आहेत. काही जण बुद्धीप्रामाण्यवादी असतात जे प्रत्येक गोष्टीची मीमांसा करतात. काही साधक कृत्रिम असतात. काही साधक मागण्या घेऊन येतात आणि त्या पूर्ण झाल्या नाही तर रागावतात. असेही काही असतात जे अनुभवासाठी बेचैन झालेले असतात. काही लोक तर व्यक्तिगत कार्यक्रमपत्रिकेसह येतात जे धोकादायक असते. आम्ही आमच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाकडे लक्ष देतो, मग तो कोणीही असो. आमचा दृष्टिकोन नेहमीच शुद्ध असतो.

गुरू आणि शिष्यामध्ये कधीच अंतर नसते. श्रद्धा आणि खरे प्रेम हे मधले अंतर मिटवून टाकते.

१६–०८–०९

तासन्तास यंत्रवत् ध्यान करण्याचा काही उपयोग होत नाही. आपण सकारात्मक सुद्धा बनले पाहिजे. देवाबद्दलचे आपले प्रेम अपुरे पडते. जर आपण ३ तास ध्यान केले, तर कमीत कमी एक तास तरी आपण समाधीचा अनुभव घेऊ शकलो पाहिजे. तरच साक्षात्काराच्या अवस्थेप्रत आपल्याला नेण्यात येईल.

ऋषी नवीन प्रयोग करीत आहेत. कायदे बदलले जात आहेत. अशा पार्श्वभूमीवर मी

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

कर्माच्या कायद्या संबंधी बोलतो आहे. हा कायदा असे सांगतो की जेव्हा आपण एखाद्या माणसाला त्याने केलेल्या चुकीबद्दल माफ करतो, तेव्हा त्या माणसाचे कोणतेही कर्म निर्माण होत नाही आणि कदाचित त्याविषयी त्याला काही समजणार देखील नाही. परंतु जेव्हा आपण क्षमा करतो तेव्हा प्रथम ही खात्री करून घ्यायला हवी की त्याला पश्चात्ताप झाला आहे आणि त्यानंतरच क्षमा करायला हवी. त्याला पश्चात्ताप झाला आहे की नाही ते कदाचित आपल्याला कधीच कळू शकणार नाही. म्हणूनच ते काम आपण देवावर सोपवावे हे उत्तम.

२८ ऑगस्ट पासून 'रा' उर्फ प्रकाश ब्रह्माच्या शक्ती ह्या धरेवरील प्रत्येकाला उपलब्ध होतील. काही कालावधी साठी 'रा' मंदिर आम्ही बंद ठेवू कारण ऋषींची अशी इच्छा आहे की कोणी ह्या शक्तींच्या थेट संपर्कात येऊ नये. 'रा' च्या शक्ती मुख्यत्वेकरून आपले शुद्धीकरण करण्यात आणि २०१२ सालापर्यंत प्रकाश शरीर मिळविण्यात आपली मदत करतात. प्रकाश ब्रह्म लोकातील शक्ती व फोटॉन बेल्टच्या शक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने मिळणाऱ्या ह्या देणग्यांचा उपयोग आपण करायला हवा. असे न केल्यास आपण एका मोठ्या संधीला मुकू.

२०१२ सालानंतर 'रा' च्या शक्ती ग्रहण करणे आपल्याला भाग पडेल. ह्या शक्ती पेशींच्या पातळीवर कार्य करतात, जुन्या पेशींना जाळून टाकतात ज्यांची जागा प्रकाशाने ओतप्रोत भरलेल्या नवीन पेशी घेतात, ज्यामुळे आपल्या शरीराचे रूपांतर प्रकाश शरीरात होते, ज्याला वार्धक्य येत नाही, जे आजारी पडत नाही किंवा ज्याला भूक लागत नाही. प्रकाश शरीरात आपल्याला झोपेचीही गरज पडत नाही. ऋषी सांगतात की प्रकाश शरीरात राहण्यासाठी आपल्याला रोज किमान ५ तास ध्यान केले पाहिजे.

'रा' च्या शक्ती आपले इच्छास्वातंत्र्य सुद्धा कमी करतात. ऋषी व उच्च स्तरीय बुद्धिमत्ता (ईश्वर) हळूहळू ही गोष्ट सर्व भौतिक ब्रह्मांडाला लागू करतील. त्यामुळे भौतिक ब्रह्मांडातून सैतानाची हकालपट्टी होईल. तेव्हापासून आपल्या ब्रह्मांडात फक्त सत्यलोकच असेल.

प्रकाश कार्यकर्ते त्यांच्या शरीराचे रूपांतर प्रकाश शरीरात करतील किंवा करणारही नाहीत, कारण ह्या पातळीवर मनुष्य प्राण्यांशी संपर्क साधण्यासाठी त्यांना घडी घडी स्थूल शरीर धारण करावे लागेल. मी कदाचित प्रकाश शरीर धारण करणार नाही कारण मला या स्थूल पातळीवरच कार्य करायचे आहे.

अलीकडेच ऋषींनी शोधून काढले आहे की अव्यक्त ब्रह्माने केवळ परब्रह्म लोकच निर्मिलेला नाही तर इतरही अनेक विश्वे निर्मिली आहेत. यापैकी काही महत्त्वाच्या लोकांत त्यांचा अभ्यास करण्यासाठी ऋषी गेले देखील आहेत. अमर्याद क्षमता असलेल्या 'मंगल ब्रह्म' नावाच्या थोर ऋषींना अव्यक्त ब्रह्माने आपल्या पृथ्वीवर पाठवले आहे. त्यांना विशिष्ट कायद्यांमधील बदल अंमलात आणायचे आहेत आणि अव्यक्त ब्रह्माच्या योजनेनुसार नवीन गोष्टी इथे आणायच्या आहेत. ते आपल्यापैकी प्रत्येकाला मदत करत आहेत.

२३-०८-०९

आध्यात्मिक विकृती असलेली माणसे आपसूकच दुष्ट शक्तींची माध्यमे बनत आहेत हे पाहून वाईट वाटते. आपले तीव्र नकारात्मक विचार अजाणतेपणे आणि आपल्या नकळत आपल्याला दुष्ट शक्तींचे माध्यम बनवतात आणि आपण ऋषींच्या विरोधात काम करू लागतो.

२८ महायुगांनंतर प्रथमच सृष्टीतील आध्यात्मिक कायद्यांचे परीक्षण व त्यात सुधारणा करण्याचे काम सुरू आहे. इच्छास्वातंत्र्याला शिस्त लावण्याचे काम सुरू आहे. इच्छास्वातंत्र्य कमी केले जाईल किंवा पूर्णपणे काढून घेतले जाईल. या मुद्द्यांवर विचार विनिमय चालू आहे. ह्या ग्रहावरून अंधाराचे समूळ उच्चाटन केले जाईल. यापुढे इथे कलियुग कधीही येणार नाही आणि महाविष्णूचे तेच ते दहा अवतार पुन्हा होणार नाहीत. माणूस जेव्हा स्वतःच्या चुकीवर मनापासून पश्चात्ताप करेल तेव्हाच त्याला माफी मिळेल. यापूर्वी माणसाला बरीच सूट देण्यात येत होती. आता त्यात बदल होत आहे.

मूल्य व्यवस्थेचा अर्थ बदलेल. समाधीच्या नवीन पायऱ्या तयार होतील. 'कुंडलिनी' मध्ये पुष्कळ सुधारणा करण्यात येतील. जुन्या नाडी व्यवस्थेच्या जागी एकच नाडी असलेली नवीन नाडी व्यवस्था अस्तित्वात येईल. ऋषींशी आणि देवाशी संपर्क साधण्यासाठी नवीन स्तर निर्माण होतील ज्यामुळे संपर्क अधिक सोपा व सरळ होईल. ज्यांच्याबद्दल आपण ऐकलेले नाही अशा नवीन क्षमता विकसित होतील. आपण नवीन शक्तींचा अनुभव घेऊ. प्रेमाला नवीन परिमाणे लाभतील. २०१२ सालानंतर जीवन संपूर्णपणे नवीन व निराळे असेल. त्यावेळी नवीन ऋतु असतील. आपण समजून घेतले पाहिजे की २०१२ साल हे वास्तव आहे आणि त्यातून पार पडण्यासाठी आपण आपली तयारी केली पाहिजे.

आपल्या जवळ वैयक्तिक कृतीयोजना असायला हव्यात. रोजचे कमीत कमी ३ तास ध्यान करणे अत्यावश्यक आहे. सर्व शंबला तत्त्वांचे आपण पालन केले पाहिजे. सर्वात महत्त्वाचा भाग हा आहे की आपण ऋषींबरोबर संपर्क प्रस्थापित केला पाहिजे. २०१२ सालानंतर ऋषी आपल्याला नवीन ज्ञान, शक्ती आणि मदत देऊ शकणार नाहीत. तेव्हा आपल्याला स्वतःचा प्रकाश, शहाणपण, आणि शक्ती यांच्या साह्याने जगायला सुरुवात करावी लागेल.

ह्या महिन्याच्या २८ तारखेनंतर ज्या नवीन शक्ती प्रसृत होणार आहेत, त्या आपल्यासाठी उत्तम आरोग्य आणि सुखसोयी यासारखे अनेक फायदे घेऊन येतील. त्यांच्यामुळे आपल्या समस्यांवर लौकर उपाय सापडतील जे आपण स्वीकारले पाहिजेत कारण ते आध्यात्मिक, अतिशय योग्य आणि उचित असतील. स्वतःचा विकास करण्यासाठी नवीन संधी मिळतील आणि स्वतःला प्रकाश शरीरात परिवर्तित करण्यासाठी आपल्याला सर्वतोपरी मदत मिळेल. ह्या शक्ती आपल्याला शिकवतील आणि योग्य निवड करण्यात आपली मदत सुद्धा करतील. आणि जर आपण जाणून बुजून नकारात्मकतेवर अडून राहिलो तर त्या तिथल्या तिथे आपल्याला दुरुस्त करण्यास किंवा शिक्षा करण्यास मागे पुढे पाहणार नाहीत.

आपल्याला वाटत होते की 'परब्रह्म' म्हणजे सर्वोच्च ईश्वर! परंतु, अव्यक्त जगात इतरही अनेक 'बुद्धिमत्ता' आहेत. खरा 'ईश्वर' कोण आहे ते आपल्याला अजून समजायचे आहे. हे सर्व चक्रावून टाकणारे आहे. ऋषी खूप निरपेक्ष कार्य करीत आहेत आणि 'ईश्वरा'चे त्यांच्यावर खूप प्रेम आहे. ऋषींच्या विरोधात जाणाऱ्यांना 'ईश्वर' शिक्षा न करता तसेच सोडून देणार नाही. हा नवीन मुद्दा आपण सतत लक्षात ठेवला पाहिजे. ❑

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट मानसा फाऊंडेशनच्या नावाने काढावा. बंगलोर बाहेरील चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

संकलनः वैशाली जोशी, अनुवादः एकनाथ कुलकर्णी

"Beyond 2012" हे पुस्तक वाचतांना "Doorways to Light" हे पुस्तक वाचल्या सारखेच वाटते. ते इतके रसपूर्ण आहे की, मी ते दोनएक तासांमध्ये वाचून संपवले. माझ्या मते ह्या विषयावरील हे एकमेव पुस्तक आहे, ज्यामध्ये इतक्या सोप्या पद्धतीने माहिती दिली आहे. ह्या पुस्तकामध्ये आपला दिव्य स्पर्श व आपले चैतन्य मला जाणवले. आपल्यामुळे किती तरी माहिती आम्हाला अतिशय सहजपणे उपलब्ध झाली आहे. गुरुजी, ह्या विस्मयकारक पुस्तकाबद्दल मी आपले आभार मानतो. –नेडू दुरई

"Beyond 2012" हे ह्या पृथ्वीतलावरील अतिशय दुर्मिळ पुस्तकांपैकी एक आहे. ह्यामधे विश्वातील उच्च स्तरांवर असणाऱ्या ऋषींनी दिलेली नवीनतम ज्ञानसंपदा आहे. आतापर्यंत मानवतेला माहीत नसलेल्या वास्तवांचे ज्ञान हे पुस्तक आपल्याला देते. अन्य स्तरांवर चालू असलेल्या ऋषींच्या कामाबद्दलची झलक ह्यामधे दिसते. हे पुस्तक मानवतेमध्ये एक आशा जागवते तसेच प्रत्येक माणसाची जबाबदारी काय आहे हे सांगते. निर्विवादपणे जगाला काही गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. हे पुस्तक बुद्धिजीवींसाठी एक आव्हान आहे. –श्यामला

"Beyond 2012" हे पुस्तक मी वाचले. हे असामान्य पद्धतीने लिहिले आहे. पुस्तक वाचताना मनापासून आनंद वाटला. गुरुजी, इतके सुंदर पुस्तक आम्हाला दिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. –सुजाता नेडू

गेले दहा दिवस मी रोज तीन तास ध्यान करीत आहे. साहजिकच मी रा-गटाचा सभासद होण्यासाठी विनंती करू इच्छितो. जेव्हा तीन तास ध्यान करण्याबद्दल मी ऐकले तेव्हा माझी सुरुवातीची प्रतिक्रिया 'अरे बापरे!' अशी होती. पण, माझ्या मनाला माहिती होते की, ही एक दुर्मिळ संधी आहे जी मी निश्चितच गमावू इच्छित नाही. जणू काही एखाद्या अवकाश यानामध्ये मला एक जागा मिळाली आहे. मला त्या यानात चढणे एवढेच करायचे आहे. –लिन करातनी

ऑगस्ट महिन्याच्या "Brief Retreat" मधील संवाद खरोखरच अद्भुत आणि आत्म्याला समाधान देणारा होता. त्यामुळे आमच्या जाणिवेत झालेला विस्तार शब्दात सांगता येण्यासारखा नाही. त्याचा फक्त अनुभवच घेता येतो. मी परमेश्वराचे खरोखर आभार मानते की इतका प्रचंड खजिना मला आपल्या तर्फे मिळाला. –विद्या वीरकर

तपोनगरातील शांत वातावरणाच्या हद्दीत प्रवेश करताक्षणी मी भारावून गेले. वेबसाईट वर मी पाहिलेली चित्रे जिवंत होऊन माझ्या समोर आली. मी खरोखरच तपोनगरात होते, हे समजायला काही मिनिटे लागली. मी आपल्याला भेटू शकले आणि आपल्या दिव्य प्रेमाचा अनुभव घेऊ शकले हे जणू काही स्वप्न आहे असे मला वाटते. माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. काही ही न मागता तुम्ही मला सर्वकाही दिले. हा माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय दिवस आहे. –पद्मजा

गेले संपूर्ण वर्षभर आम्हाला पुष्कळ अडचणी आल्या. केवळ तुमच्या आशीर्वादामुळे आम्ही त्यांना धीराने तोंड देऊ शकलो. गेल्या वर्षी आम्ही तुम्हाला भेटलो आणि आम्हाला समजले की आम्ही योग्य मार्गात आहोत. आता आमच्या जन्माचे उद्दिष्ट आम्ही जाणले आहे, सृष्टीविषयी वगैरे जाणले आहे आणि आता तुमच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला ह्याच मार्गात राहायला आवडेल. –स्मिता गिरी

ध्यान करण्यास चालू केल्यापासून माझा आत्मविश्वास आणि इच्छाशक्ती खूप वाढली आहे. मी आता इतरांना समजून घेऊ शकते. कित्येक गोष्टी घडण्यापूर्वीच मला त्यांची जाणीव होत असते. –चारुशीला बिराजदार

माझे पती आणि मी एका "हीलर" कडे गेलो होतो. जेव्हा ते मला वेदनामुक्त करण्याचा प्रयत्न करीत होते तेव्हा माझ्या पतीने आपल्यालाच माझ्यावर उपचार करताना पाहिले. मला अतिशय धन्य वाटते कि आपल्या दैवी शक्ती माझ्या जवळ आहेत. –मेघना रानडे

शिक्षकदिनाच्या या दिवशी मला खरोखरच कळत नाही की, प्रत्येक विद्यार्थीसाठीच नव्हे तर पृथ्वीतलासाठी आणि सर्व मानवतेसाठी आपण जे केले आहे, त्याबद्दल आपला सन्मान कसा करावा. मी फक्त एवढेच म्हणू शकतो की, प्रत्येक माणसासाठी जे आपले स्वप्न आहे, त्याप्रमाणे जगण्याचा प्रयत्न मी करीन. –निखिल गांधी

उत्तर देण्यात झालेल्या दिरंगाईबद्दल मी क्षमा मागतो. मी गेले दोन दिवस विचार करीत होतो की एखाद्या गोष्टीबद्दल आपल्या गुरुंना वचन देणे किती अवघड आहे. नंतर माझ्या लक्षात आले की, आपल्या आशीर्वादाशिवाय मी काहीही करू शकणार नाही. आपल्या मार्गदर्शनाखाली काम करण्यासाठी कृपया मला आशीर्वाद द्यावा. तपोनगरापासून दूर असलेल्या माझ्या घरुन मी काम करू शकतो का? –दीपक

# प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. कर्मकांडाप्रमाणे पूजा, अभिषेक इत्यादी विधी करणे चुकीचे आहे का?**

उ. कर्मकांडाप्रमाणे पूजाविधी करणे चुकीचे नाही, पण आता त्याची आवश्यकता उरली नाही कारण आता आपल्याजवळ असलेल्या सुस्पष्ट ज्ञानामुळे आपण स्वतःच शक्ती अर्पण करून देवाची पूजा करू शकतो.

**प्र. आपण भीतीच्या पलीकडे कसे जाऊ शकतो?**

उ. आपल्याला देवाशी एकत्व साधायला हवे. आपल्या स्वतःला त्याच्याशी जोडायला हवे आणि आपल्याला देवत्वात खोलवर रूजून रहायला हवे तरच आपल्याला निर्धास्तपणा आणि संरक्षण मिळेल. मग भीती अजिबात उरणार नाही.

**प्र. मी माझ्या रागावर ताबा कसा मिळवू?**

उ. रागावर ताबा मिळवण्यासाठी जाणीवपूर्वक, अविरत आणि अविचल प्रयत्नांची आवश्यकता असते. आपल्याला शंबला तत्त्वांचे पालन पण करायला पाहिजे आणि राग न येण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे. जेव्हा तुम्हाला राग येतो तेव्हा लगेच प्रतिसाद देऊ नका, एक क्षणभर थांबा, जाणीव पूर्वक रागाला बाजूला सारा. मग कदाचित तुम्ही योग्य रीतीने प्रतिसाद देऊ शकाल.

**प्र. मी ऋषींच्या कार्यात सहभागी होण्यासाठी पात्र आहे का?**

उ. प्रत्येकच जण पात्र आहे.

**प्र. त्या साठी काय पात्रता असावी लागते ?**

उ. शरीर, मन आणि बुद्धी या सर्व पातळ्यांवर शुद्धता; ऋषींच्या कार्याप्रती दृढ वचनबद्धता – नेहमीसाठी, पुढील संपूर्ण काळासाठी. आपण ऋषींच्या आज्ञेचे पालन करायला हवे कारण त्यांना भूतकाळ आणि भविष्यकाळ माहीत असतो. आपण आपला अहंकार सोडून द्यायला हवा. आपण आध्यात्मिक मुक्तता पाळायला हवी; म्हणजेच अंधविश्वास, अंधश्रद्धा, युगायुगांपासून चालत आलेल्या रूढी, चालीरीती यांना दूर सारले पाहिजे. धर्म हेच मुळी कर्मकांडाचे आणि चुकीच्या चालीरीतींचे गाठोडे आहे हे जाणून घेऊन त्याच्या पलीकडे जायला हवे. आपण विस्तीर्णतेचा अनुभव घेऊन आपल्या जीवनात त्याचे आविष्करण करायलाच हवे. आपण निश्चितपणे बदलाला निवडायला हवे. जेव्हा आपण निर्णायक अवस्थेत पोहोचतो त्या प्रत्येक वेळी आपण योग्य गोष्टींना निवडायला हवे. आपण ऋषींना निवडायला हवे.

**प्र. ऋषींचे हे कार्य काय आहे?**

उ. हे कार्य असे आहे : प्रकाशाचा अनुभव घेणे आणि प्रकाशाचे प्रकटीकरण करणे; प्रेम, शांती आणि सत्याने पुरेपूर भरलेल्या या प्रकाशाला अनुभवण्यात आणि प्रकट करण्यात इतरांची मदत करणे; हे नवे ज्ञान आपल्या स्वतःला पूर्णपणे ज्ञात झाल्यानंतर इतरांपर्यंत पोहोचवणे; ऋषींकडून आलेल्या आणि पुढे मधून मधून येणाऱ्या सूचनांचे पालन करणे. आपण स्वतः ध्यान केले पाहिजे आणि जास्त लोकांना ध्यान–मार्गात आणले पाहिजे; आमचे मासिक नियमित वाचले पाहिजे आणि नवे वर्गणीदार मिळविले पाहिजेत कारण हा कार्याचाच एक भाग आहे. हे ज्ञान जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून आमची पुस्तके विकण्यात आम्हाला मदत करा. शिक्षक आणि स्वयंसेवक म्हणून काम करा. प्रकाशाचे प्रसारण करा आणि जास्तीत जास्त प्रवाहक मिळवा. ज्यांच्याजवळ गरजेपेक्षा अधिक धन आहे ते आम्हाला देणगी देऊ शकतात.

**प्र. सर्व मानव हे एक सारखे घडवलेले नसतात का?**

उ. सगळे मानव एक सारखेच घडवलेले असतात. देवाच्या राज्यात सगळे समान असतात. इथे प्रत्येकासाठी संधी असतात.

**प्र. इच्छा–स्वातंत्र्य हा शाप आहे का?**

उ. तो काही शाप नव्हे. खरं पाहिलं तर ही सर्वात मोठी देणगी आहे पण तिचा सर्वात जास्त गैरवापर झाला आहे. आपल्याला सर्वोत्तम संधी आणि वातावरण पुरवले गेले असून देखील आपण चुका करतो आणि चुकीचे निर्णय घेतो. ❑


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| Beyond 2012 | 80/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| New Age Realities | 200/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| A Package from the Rishis (containing 5 Booklets) - How to Meditate - Dhyana Yoga - Descent of Soul - Practising Shambala Principles - Astral Ventures of A Modern Rishi | 250/- |
| The Masters Answer | 120/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

## ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

REGISTERED RNI. No. KARMAR/2008/27314
Date of posting Newsletter-25th of Every Month. No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### प्रकाशाचे प्रसारण

दर शुक्रवारी १० ते १ वाजेपर्यंत गुरुजींसोबत ध्यान–साधक प्रकाशाचे प्रसारण करतात. ह्यात सामील होण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा.

## आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे)

"गुरुजी स्पीक्स" ह्या पुस्तकात, ऑगस्ट १९८२ ला महर्षी अमरांच्या महानिर्वाणाच्या थोड्या आधी गुरुजींच्या महर्षी अमरांसोबत झालेल्या अखेरच्या संभाषणाबद्दल उल्लेख केला आहे. तो प्रसंग फारच हृदयस्पर्शी आहे. मला असे वाटले की, मी कमनशिबी आहे कारण महर्षी अमरांसारख्या दैवी महात्म्याला ते हयात असताना मी भेटू शकले नाही. नंतर मला एक स्वप्न पडले, त्यात महर्षी अमरांच्या फोटोतून शक्ती निघून माझ्या शरीरात शिरताना मी पाहिले. नंतर स्वप्नात मी अमरजींना माझ्या शेजारी उभे राहून माझ्या अंगावरून नखशिखांत हळूवारपणे हात फिरवून माझ्या शरीरात शक्ती पाठवत असताना पाहिले. मी त्यांच्या प्रतिसादामुळे हेलावून गेले. –कमल डी.

इतक्यातच, मी बिछान्यात पडलो होतो पण निद्राधीन झालो नव्हतो आणि पूर्ण जागृतावस्थेत असताना मला माझ्या शरीरातून बाहेर निघण्याचा अनुभव आला. अचानक माझ्या सर्वांगाला प्रचंड कंप सुटला आणि ह्याचा मी स्वतः साक्षीदार होतो. मी माझ्या शरीराच्या बाहेर फेकला गेलो आणि फार वेगाने बाहेर जाऊ लागलो. त्यावेळी मला जाणीवपूर्वक समजले की ते भौतिक शरीरातून बाहेर पडलेले माझे सूक्ष्म शरीर होते. मी सप्तऋषींना भीतीमुळे की काय पण अजाणतेपणी प्रार्थना करायला सुरूवात केली कारण मी जीवनात पहिल्यांदाच मरण सदृश अनुभव घेत होतो. अचानक शरीराचा कंप थांबला आणि मी जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी बिछान्यात होतो. हे सगळं काही क्षणांसाठी घडलं असलं तरी मला हे समजले आणि लक्षात आले की मी म्हणजे हे शरीर नाही. –सुरेश कुमार

२८ ऑगस्टला मी "रा शक्तींचे" प्रसारण करत होते. काही कारणामुळे मला ते थांबवावे लागले. मी माझ्या छाया–व्यक्तीला माझ्या वतीने प्रकाशाचे प्रवहन करण्यासाठी आणि आनंद पसरवण्यासाठी विनंती केली. तेव्हा मी पूर्ण वेळ 'रा'च्या शक्ती आणि आनंद या दोन्ही गोष्टी अनुभवत होते. रात्री झोपण्यापूर्वी मी माझ्या छाया व्यक्तीला निळ्या प्रकाशाचे प्रवहन करताना आणि आनंद पसरवताना अगदी स्पष्टपणे पाहिले.

एके दिवशी मला सूक्ष्मदेहाने प्रवासाची एक झलक दिसली. मी मोठ्या सोनेरी प्रकाशाकडे जात आहे असे मी पाहिले आणि मला खूपच आनंद झाला. संपूर्ण दिवस माझ्या मनात एक नाव उमटत होते पण मी ते नीट ओळखू शकले नाही. ते अद्वैत किंवा अव्यक्त असे काहीसे असावे असे मला वाटत होते. दोन आठवड्यांनंतर गुरूजींनी ध्यानवर्गात अप्रकट देवाबद्दल सांगताना त्याला "अव्यक्त ब्रह्म" असे संबोधले आणि माझ्या लक्षात आले की, हेच शब्द काही दिवसांपूर्वी माझ्या मनात रुंजी घालत होते! –राखी

जन्माष्टमीच्या दिवशी ध्यानाला सुरुवात करण्यापूर्वी मी भगवान कृष्णाला शक्ती प्रदान केल्या आणि माझ्या त्राटकाच्या जागी मला निळा प्रकाश दिसला. तो प्रकाश चक्राकार फिरता फिरता माझ्या छातीत शिरला. मी माझ्या छातीच्या मध्यभागी श्रीकृष्णाला हातात बासरी घेऊन सुवर्ण कमळावर बसलेले पाहिले. ध्यान करताना मी कृष्णाला बाळ रूपात, किशोर रूपात आणि युवक रूपात पाहिले. मी पूर्णतः आनंदमय होऊन गेले आणि मला असे वाटले की कृष्ण माझ्या आत बसून मला त्याच्या लीला दाखवत आहे. –नागमणी

३० ऑगस्टला मी ध्यानाच्या वर्गाला उपस्थित राहू शकले नाही. पण ११.३० वाजता जेव्हा मी तपोनगराशी मानसिक संपर्क साधला तेव्हा मी गुरुजींच्या शेजारी महर्षी अमरांना बसलेले पाहिले. मी त्यांना आदर व शक्ती अर्पण केल्या. त्यानंतर लगेचच मी समाधी अवस्थेत गेले आणि मला महर्षी अमरांकडून काही माहिती मिळू लागली. पांढऱ्या धाग्यापासून बनवलेले दैदीप्यमान आणि चकाकणारे एक यंत्र माझ्या उजव्या मनगटावर बांधण्यात आले. मी त्याच अवस्थेत बराच काळ होते आणि नंतर माझे मन अगदी विचाररहित व शून्य झाले. –नागश्री

PRAKASHMARG An Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation, Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149.
Editor : Jayant Deshpande